follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २९२ सातारा * सोमवार * दि. ८ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# आसाममध्ये पूरस्थिती गंभीर

## ७८ जणांचा मृत्यू, पूरग्रस्तांना भेटणार राहुल गांधी

**आसाम :** आसामला भीषण पुराचा तडाखा बसला आहे. आसाममधील२९ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे २४ लाख लोकांना याचा फटका बसला आहे. आतापर्यंत ७८ जणांचा मृत्यू झाला आहे. ब्रह्मपुत्रेसह राज्यातील अनेक प्रमुख नद्या धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत. याच दरम्यान आता काँग्रेसचे नेते राहुल गांधीसोमवारी आसाममधील पूरग्रस्तांची भेट घेणार आहेत.



राहुल गांधी आज मणिपूर दौऱ्यावर जात आहेत. मणिपूरला जाताना राहुल आसाममधील कछार जिल्ह्यातील सिलचर येथील कुंभीग्राम विमानतळावर पोहोचतील. येथून राहुल लखीपूर येथील पूरग्रस्तांना मदत करणाऱ्या शिबिरात जाऊन तेथील लोकांची परिस्थिती जाणून घेणार आहेत. येथून राहुल मणिपूरमधील जिरीबाम येथे पोहोचतील.

आसाममधील पुरामुळे परिस्थिती गंभीर निर्माण झाली असून सुमारे २४ लाख लोकांना या नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला आहे. राज्यभरात ब्रह्मपुत्रेसह अनेक प्रमुख नद्या धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत. पूर, भूस्खलन आणि वादळामुळे यावर्षी आतापर्यंत ७८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

तसेच गेल्या २४ तासांत आणखी आठ जणांचा मृत्यू झाला आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (एएसडीएमए) बुलेटिनमध्ये, धुबरी आणि नलबारी येथे प्रत्येकी दोन मृत्यू, कछार, गोलपारा, धेमाजी आणि शिवसागर येथे प्रत्येकी एकाचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात आलं. धुबरीमध्ये सर्वाधिक ७५४७९१ लोक बाधित झाले आहेत. राज्यातील २६९ मदत छावण्यांमध्ये ५३,६८९ लोकांनी आश्रय घेतला आहे. नेमातीघाट, तेजपूर आणि धुबरी येथे ब्रह्मपुत्रा नदी धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहे. खोवांगमधील बुरहीडीहिंग नदी, शिवसागरमधील दिखौ, नंगलामुराघाटमधील दिसांग, नुमालीगढमधील धनसिरी, धरमतुलमधील कोपिली, बारपेटामधील बेकी, गोलकगंजमधील संकोश, बीपी घाटातील बराक आणि करीमगंजमधील कुशियारा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे.राहुल गांधी याआधी गुजरातमधील मोरबी अपघात आणि राजकोट गेमिंग झोन अपघातातील पीडितांना भेटण्यासाठी अहमदाबादला पोहोचले होते.

तसेच राहुल यांनी नुकतीच हाथरस चेंगराचेंगरीतील मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती. हाथरस येथे भोले बाबांच्या सत्संगाच्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत तब्बल १२१ जणांचा मृत्यू झाला आहे.

# पंढरीचा विठुराया भाविकांच्या दर्शनासाठी २४ तास उभा

## व्हीआयपी, ऑनलाईन दर्शन बंद

**पंढरपूर :** सावळ्या विठुरायाच्या आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी आता २४ तास उभा राहणार आहे. दि ७ जुलै ते २६ जुलैपर्यंत या कालावधीत देवाचे दर्शन २४ तास राहणार आहे. देवाचा विश्रांतीचा चांदीचा पलंग विधिवत पूजा करून काढण्यात आला. त्यानंतर विठ्ठलाच्या मागे आणि रुक्मिणी मातेच्या पाठीला मऊ कापसाचा लोड लावण्यात आला असल्याची माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली . दरम्यान, आषाढी एकादशी १७ जुलै रोजी आहे.



वारकरी संप्रदायाला शेकडो वर्षांची परंपरा आहे. या परंपरेनुसार आषाढी आणि कार्तिकी वारीच्या दरम्यान भाविकांना दर्शन सुलभ व्हावे म्हणून देव २४ तास उभा असतो. या कालवधीत देवाच्या शेज-घरातील विश्रांतीचा पलंग काढला जातो. हा पलंग काढण्याआधी विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर देवाच्या शेजघरातील पलंग बाहेर काढण्यात आला. यावेळी या चांदीच्या पलंगावरील देवाच्या गाद्या गिरद्या देखील बाहेर काढून ठेवण्यात आल्या. देवाचे शेजघर मोकळे करून ठेवण्यात आले . आजपासून देवाचे सर्व राजोपचार बंद करून देव फक्त भाविकांच्या दर्शनासाठी सज्ज झाला आहे . विठ्ठलाच्या व रुक्मिणीमातेच्या पाठी मऊ कापसाचा लोड ठेवण्यात आला आहे. जेणेकरून देवाला शीणवठा येणार नाही अशी भावना वारकरी संप्रदायाची आहे. देवाचे दर्शन २४ तास खुले केल्याने आता रोज पायावर ५० हजार तर मुखदर्शनातून ५० ते ६० हजार भाविकांना दर्शन मिळू शकणार आहे.

पहाटे साडेचार वाजता देवाचे स्नान आणि नित्यपूजा करण्यात येईल. या काळात फक्त १ तास दर्शन बंद असेल. यानंतर दुपारी महानैवेद्याला १५ मिनिटे आणि रात्री नऊ वाजता लिंबू पाणी देण्यासाठी १५ मिनिटे दर्शन थांबविण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. याशिवाय संपूर्ण दिवस रात्र विठुराया आपल्या लाडक्या भक्तांना दर्शन देत उभा असणार आहे.

# हरे राम, हरे कृष्णाच्या जयघोषात जगन्नाथ रथयात्रा ! हजारोंच्या समुदायाने परिसर दुमदुमला

## फडणवीस यांच्या हस्ते होणार भूमिपूजन



**पुणे :** हरे रामा, हरे कृष्णाच्या जयघोषात अन् जय जगन्नाथ, जय बलराम, जय सुभद्राचे नामस्मरण केल्याने मध्य पुण्याचा परिसर दुमदुमून गेला. महाराष्ट्रासह तमिळनाडू, कर्नाटक, बंगाल आणि ओरिसा प्रांतातील पारंपरिक वाद्याच्या गजरात आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ - इस्कॉन, पुणे यांच्यातर्फे जगन्नाथ रथयात्रा महामहोत्सव उत्साहात झाला.

ओडिसामधील जगन्नाथ पुरी येथे रथयात्रा मोठया उत्साहात साजरी होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पुण्यामध्ये हा महामहोत्सव दरवर्षी आयोजिला होता. यंदाचे हे ८ वे वर्ष आहे. खासदार मेधा कुलकर्णी, महाराष्ट्र राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सल्लागार मंडळाचे सदस्य राजेश पांडे, इस्कॉन संस्थेचे संन्यासी प.पू. कृष्णचैतन्य स्वामी, प्रबोधानंद स्वामी आणि इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू यांच्या हस्ते स.प.महाविद्यालयाच्या प्रांगणात आरती करुन रथयात्रेला प्रारंभ झाला. भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा यांच्या मूर्ती विराजमान असलेल्या रथाची उंची २० फूट इतकी असून फुलांसह रंगीबेरंगी कापडांनी रथावर सजावट केली होती. रथयात्रा समारोपानंतर भगवंतांना ५६ भोगांचा नैवेद्य अर्पण करून आरती देखील झाली. रथयात्रा मार्गावर १ लाख प्रसादाची पाकिटे वाटण्यात आली.

भगवान जगन्नाथ, भगवान बलराम आणि सुभद्रा लोकांना दर्शन, आशीर्वाद आणि कृपा देण्यासाठी रस्त्यावर येतात. जगन्नाथ पुरी येथे शतकानुशतके ही रथयात्रा काढली जाते. हा सोहळा साजरा करण्यासाठी जगन्नाथ पुरी येथे लाखो लोक जमतात. परंतु जगन्नाथ पुरी येथे प्रत्येकजण वैयक्तिकरित्या जाऊ शकत नाही. त्यामुळे इस्कॉनचे संस्थापक आचार्य श्रील भक्तीवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी भगवान जगन्नाथाची कृपा जगभर पसरवण्यासाठी रथयात्रा सुरू केली.

# राज्यात पावसाचा हाहाकार; जनजीवन विस्कळीत, रस्त्यांना नदीचे स्वरुप

**गोवा पणजी :** रविवारी सकाळपासून जोरदार पावसाने राज्याला झोडपून काढले. अनेक ठिकाणी दरड कोसळल्याचे, पडझड झाल्याची घटना समोर आल्या आहेत, तर आले आहे. पेडणे, डिचोली, साखळी, वाळपई, फोंडा, कुठ्ठाळी, सांगे, काणकोण या भागात झाडे, घरे कोसळण्याचे प्रकारही समोर आले आहे. अनेक ठीकाणी लोकांच्या घरांमध्ये देखील पाणी शिरले आहे. अग्निशामक दल आणि आपत्ती व्यवस्थापनाची खास टीम यांचीही धावपळ सकाळपासून सुरु आहे.



गोवारेड अलर्टवर असून, रविवारी पहाटेपासूनच न थांबता जोरदार पाऊस सुरु आहे. यातून जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेकांनी घरातून बाहेर निघणे टाळले आहे. दरड, झाडे कोसळल्याने अनेक रस्ते बंद ठेवण्यात येत आहे, परीणामस्वरुप वाहतुकही ठप्प झाली आहे. अनेक ठिकाणी सकाळपासूनच वीजही गायब झालेली आहे. डिचोली, सत्तरीतील अनेक नद्यांच्या पातळीत वाढ झालेली देखील दिसून येत आहे.स्मार्ट सिटी पणजीतील रस्त्यांना नदीचे स्वरुपरविवारी पडलेल्या स्मार्ट सिटी पणजीतील रस्त्यांना नदीचे स्वरुप आले आहे. अनेक मुख्य रस्ते पाण्याखाली गेले आहे. सोमवारी पावसाचे प्रमाण तुलनेत खुप कमी होते, तरी पाटो प्लाझा येथील अनेक रस्त्यांवर भरतीमुळे पाणी तुंबले होते. पार्किंग केलेली वाहने देखील अर्धी बुडलेली होती. यापेक्षा अधिक बिकट स्थिती रविवारी पाटो भागाची झाली आहे. वाहनचालकांना या पाण्यातून वाट काढणे देखील कठीण बनले आहे. पाटोत अनेक ठिकाणी सांडपाणी वाहीनींचे चेंबर्स फुल्ल झाल्याने हे पाणी देखील पावसात साठलेल्या पाण्यात मिसळल्याने दुर्गंधी पसरली आहे.अग्निशामक दलाची चेतावणी

राज्यात सुरु असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर विनाकारण घरातून बाहेर न जाण्याची चेतावणी अग्नीशामक दलाने दिली आहे. तसेच ज्यांची घरे मातीची आहे, त्यांनी विषेश काळजी घेत, आपल्याला सुरक्षित ठेवावे. अनेक ठिकाणी पडझड होत असल्याने आम्हाला वेळेत घटनास्थळी पोहचणे शक्य होत नाही, त्यामुळे लोकांनी प्राथमिक स्तरावर काळजी घ्यावी, असेही दलाने म्हटले आहे.

# हाथरस प्रकरणात आवश्यकतेनुसार चौकशी; आयोगाची स्पष्टोक्ती

**दिल्ली :** हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणात आवश्यक असेल त्याची चौकशी होईल, यात स्वयंघोषित धर्मगुरू भोलेबाबाचीही चौकशी केली जाईल, अशी स्पष्टोक्ती रविवारी उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या न्यायालयीन आयोगाचे सदस्य भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) माजी अधिकारी भावेश कुमार यांनी दिली. आयोग याप्रकरणी लवकरच नोटीस जारी करणार असून, स्थानिक नागरिक आणि साक्षीदारांना चेंगराचेंगरीशी संबंधित कोणतेही पुरावे, त्यांच्या जबाबासह देण्यास सांगितले जाईल, असे समितीचे अध्यक्ष तथा अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश ब्रिजेश कुमार श्रीवास्तव यांनी सांगितले.

# पावसाचा जोर वाढल्याने कास तलाव भरला



**सातारा :** सातारा शहराची लाईफ लाईन असणारा कास तलाव पावसाचा जोर वाढल्यामुळे ओसंडून वाहू लागला. कास धरणाच्या भिंतीवरून पाणी वाहू लागले आहे. तलावात आता ०.००५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा झाला आहे. कास तलाव भरल्यामुळे सातारकरांचा वर्षभराचा पाण्याचा प्रश्न आता मिटला आहे.

सातारा पालिकेने कास धरणाची १२.४३ मीटर उंची वाढवल्यानंतर काल धरण प्रथमच पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागले आहे. सातारा शहराची२०४० पर्यंतची लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन कास धरणाची उंची १२.४२ मीटर उंची वाढवण्यात आली होती. या कामासाठी तब्बल ६० कोटी रुपये खर्च आला. सातारा शहरासह पठारावरील १५ गावांची तहान हा तलाव भागवत असतो. कास धरणाची भिंत वाढवण्याबरोबर धरणाच्या पिछाडीला पायऱ्यांचे टप्पे करण्यात आले आहेत. सततचा पाऊस, मंद धुके, निसर्गरम्य वातावरण यामुळे कास धरण परिसरात पर्यटकांची गर्दी वाढतच आहे.

शनिवारी दुपारी साडेबारा वाजता कास धरण ओव्हर फ्लो झाले आहे. तीनच दिवसापूर्वी कास तलावामध्ये ५६ फूट पाणीसाठा झाला होता. पावसाचा जोर कायम राहिल्याने कास धरण भरून वाहू लागले. धरण परिसर हा घळीप्रमाणे असल्यामुळे डोंगरातील ओहोळांचे पाणी खळखळून तलावांमध्ये येत आहे. गेल्या पाच दिवसापासून पावसा-चा जोर कायम असल्यामुळे धरण ओसंडून वाहिले आहे.

# रायगडाला पावसाचा तडाखा अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती ; अलिबाग मुरूडमध्ये शाळांना सुट्टी

**अलिबाग :** रविवारी रात्री झालेल्या पावसाचा रायगडला तडाखा बसला आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अनेक भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नद्यांच्या पाणी पातळीतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अलिबाग आणि मुरूड तालुक्यातील शाळा आणि महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर केली आहे.

शनिवार पाठोपाठ रविवारीही रायगड जिल्ह्यात पावसाचे रौद्र रूप पहायला मिळाले. शनिवारी कर्जत, खोपोली, पनवेल, सुधागड, रोहा तालुक्यांना पावसाचा तडाखा बसला होता. रविवारी महाड, पोलादपूर, अलिबाग, श्रीवर्धनमध्ये अतिजोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे ठिकठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. अलिबाग तालुक्यात रविवारी रात्री साडेअकरानंतर विजांच्या कडकडाटासह पावासाला सुरूवात झाली, पहाटे तीन वाजेपर्यंत तुफान पाऊस सुरू होता. त्यामुळे अलिबाग शहरासह, चेंढरे, नेऊली, खंडाळे परिसर जलमय झाले होते. मध्यरात्री अनेक घरांमधे पावसाचे पाणी शिरले होते. त्यामुळे रहिवाश्यांची तारांबळ उडाली होती. घरातील सामानाला सुरक्षित ठेवण्यासाठी धावपळ सुरू होती. अलिबाग तालुक्यात रामराज, चरी, सारळ, किहीम, चौल, पोयनाड परिमंडळात अतिवृष्टी झाली.

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सावित्री, कुंडलिका, अंबा, पाताळगंगा, उल्हास आणि गाढी नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली होती. कुंडलिका नदीने शनिवारी रात्री दहा वाजता इशारा पातळी ओलांडली होती. त्यामुळे नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले होते. दरम्यान अलिबाग आणि मुरुड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली. पण हे आदेश येण्यास उशीर झाल्याने सकाळच्या सत्रातील शाळा नियमित सुरू होत्या.

तळा २८७, म्हसळा २७३, मुरुड २५५, अलिबाग १७०, श्रीवर्धन १३१, माणगाव ९२, रोहा ९३, पनवेल ९० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात सोमवारी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात सरासरी १०८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

# राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केल्याबद्दल महिलांनी मानले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार



**बारामती :** राज्याच्या अर्थसंकल्पात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजने'सह महिला- भगिनींसाठी अनेक योजनांचा समावेश करून त्यांना दिलासा दिल्याबद्दल विविध क्षेत्रातील महिला- भगिनींनी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांना विमानतळ येथे ओवाळून त्यांचे आभार मानले.

यावेळी यावेळी अपर पोलीस अधीक्षक संजय जाधव, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर, कार्यकारी अभियंता अमोल पवार, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव, माजी उपनगराध्यक्ष जय पाटील, वैशाली नागवडे, मोनिका हरगुडे यांच्यासह विविध क्षेत्रातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी उपस्थित महिलांनी महिलांसाठी शासन राबवित असलेल्या विविध योजनांबाबत समाधानही व्यक्त केले. त्यांनी फुलांची उधळण करीत आनंद व्यक्त केला.

# पाटण -संगमनगर रस्त्याची चाळण

## रास्तारोको आंदोलनाचा बबन कांबळे यांचा इशारा



**पाटण :** कराड -चिपळूण महामार्गावर संगमनगर (धक्का) ते म्हावशीपर्यंतच्या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता हेच समजत नाही. दरवर्षी प्रमाणे या दरम्यानच्या रस्त्याचे दुखणे सुरूच असते,

प्रत्येकवर्षी खड्डे भरले जातात आणि पहिल्याच पावसात ते वाहून जातात. काम दर्जेदार होत नाही, शासनाचा निधीची उधळपट्टी करून अधिकारी व ठेकेदार मात्र मालामाल झाले आहेत. या रस्त्यासाठी आतापर्यंत झालेल्या खर्चाची चौकशी होवून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अन्यथा सात दिवसात संगमनगर येथे रास्तारोको करून आंदोलन छेडू, असा इशारा परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने पाटण पंचायत समिती सदस्य बबनराव कांबळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनाची प्रती प्रांताधिकारी पाटण, तहसीलदार पाटण, सहाय्यक कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग सातारा यांना देण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे, कराड-चिपळूण राज्य मार्गावरील संगमनगर (धक्का) ते म्हावशी अशा १३ किलोमीटर अंतराच्या रस्त्याच्या रूंदीकरणासाठी केंद्राकडून २१२.४९ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. याबाबतचे पत्रही संबंधित विभागाने दिले होते. तत्पूर्वी काही महिन्यांपूर्वी संगमनगरसह इतर ठिकाणी रस्त्यावर पडलेले खड्डे भरून नवीन रस्ता तयार करण्यात आला होता. प्रत्येकवेळी खड्डे पडल्यावर ते भरण्यासाठी संबंधित विभागाकडून निधी खर्ची टाकला जातो. मात्र पहिल्या पावसातच हा रस्ता वाहून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडतात. अधिकारी व संबंधित ठेकेदार रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम करतात. मात्र कामाचा दर्जा तपासला जात नाही ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल.

संगमनगर (धक्का) ते येरफळेपर्यंतचा रस्ता अनेक ठिकाणी उखडला आहे. मोठमोठे खड्डे पडल्याने वाहना चालकांन मोठी कसरत करत यातून ये-जा करावी लागत आहे. खड्डे चुकवण्याच्या नादात लहान-मोठ्या अपघातांची मालिका सुरू झाली आहे. चार महिन्यापूर्वी केलेल्या रस्त्याची खड्डे पडून आज चाळण झाली आहे.

काम दर्जेदार होत नसल्याने केवळ पाण्यासारखा पैसा वाया घालवून ठेकेदार मात्र मालामाल झाला आहे. संबंधित विभाग, ठेकेदाराकडून निव्वळ पैशाची उधळपट्टी सुरू आहे. अनेक जणांना यापूर्वी आपला जीव गमवावा लागला तर काही जण कायमचे अपंगत्व आले आहे. त्यामुळे यापूर्वी या रस्त्यासाठी खर्च केलेल्या निधीची चौकशी होवून संबंधित ठेकेदार व अधिकारी यांना जबाबदार धरावे. तसेच नवीन कामाची निविदा निघेपर्यंत या मार्गावरील खड्डे भरण्यासाठी संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या खिशातूनच खर्च करण्यात यावा. याबाबत निर्णय न झाल्यास येत्या सात दिवसात संगमनगर (धक्का) येथे रास्तारोको आंदोलन करू, असा इशाराही सदस्य बबनराव कांबळे यांनी निवेदनात शेवटी दिला आहे.

# हडपसरमधील जेएसपीएम कॉलेजजवळ वृक्षारोपण



**हडपसर :** माणसाने झाडे निसर्गाला वाचविण्यासाठी नाही तर स्वतःला वाचविण्यासाठी लावावे , निसर्ग सौंदर्य वाढविण्यासाठी , ऑक्सिजन मिळविण्यासाठी , सुध्द हवेसाठी , पर्यावरण संतुलनासाठी झाडे लावणे गरजेचे आहे , कोरना काळात सर्वांना ऑक्सिजनची अवश्यकता भासली , मानव निसर्गाचा -हास करीत आहे हे रोखण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावले आणि ते जगवले तर नक्कीच निसर्ग समतोल राहिल असे मत भाजपाच्या महिला आघाडी पुणे शहर सरचिटणीस स्मिता गायकवाड यांनी

सामाजिक कार्य करणा-या अंजली शहा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्षवल्ली आम्हा सोयरे या संस्थेच्या सहकार्याने जीएसपीएम कॉलेजच्या जवळ वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी त्या बोलत होत्या. वृक्षवल्ली आम्हा सोयरे या संस्थेचे अध्यक्ष आनंद निंबाळकर , सदस्य रवी पाटील व इतर सर्व.सदस्यांनी विविध जातीचे ४३ झाडे लावून सामाजिक उपक्रम राबविला.यावेळी भाजपा पुणे शहर सरचिटणीस स्मिता गायकवाड, भाजपा हडपसर विधानसभा उपाध्यक्ष रेखा आबनाबे, सामाजिक कार्यकर्त्यां अंजली शहा, उज्वला ढवळे, निकिता निंगाले, लता सोनवणे, काशिनाथ भुजबळ, यादव काका इतर भाजपा पदाधिकारी, स्मितसेवा फाउंडेशन सदस्य व मित्रपरिवार उपस्थित होते.

# काँकट, कमिशन, करप्शन ही काँग्रेसची त्रिसूत्री

## मुख्यमंत्री शिंदे यांची टीका



**नागपूर :** कट, कमिशन व करप्शन ही काँग्रेसची त्रिसूत्री आहे. २०२४ मध्ये जंग जंग पछाडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पराभव करू शकले नाहीत. घोटाळ्याचा डाग लावू शकले नाहीत. त्यामुळे काँग्रेसला घोटाळ्यावर बोलण्याचा नैतिक अधिकार नाही, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

मुख्यमंत्री शिंदे नागपुरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले, काँग्रेसला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बोलण्याचा अधिकार नाही. काँग्रेसच्या काळात अनेक घोटाळे झाले. घोटाळ्यांची मालिका इतकी मोठी होती की, २०१४ व २०१९ मध्ये जनतेने काँग्रेसला घरी बसवले.

लोकसभेमध्ये लोकांनी दाखवून दिले की, उद्धव ठाकरे यांच्यापेक्षा आम्हाला जास्त मते मिळाली. उद्धवसेनेचा स्ट्राइक रेट ४२ टक्के होता तर आमचा स्ट्राइक रेट ४७ टक्के आहे. आता रडणं बंद करा. शिवसेनेचा मूळ मतदार हा धनुष्यबाणासोबत आहे, याची प्रचिती विधानसभेत येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# श्री सेवागिरी महाराजांच्या दिंडीचे सोमवारी प्रस्थान



**पुसेगाव :** येथील श्री सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्टने दि. ८ ते १८ रोजीदरम्यान आषाढी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले आहे. दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची मुक्काम, अल्पोपाहार, जेवण, आरोग्यसेवा तसेच औषधपाण्याची मोफत सोय केली आहे. या दिंडीत पुसेगाव व पंचक्रोशीतील अधिकाधिक वारकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन देवस्थानचे मठाधिपती सुंदरगिरी महाराज, ट्रस्टचे चेअरमन रणधीर जाधव व विश्वस्तांनी केले.

श्री सेवागिरी देवस्थानच्या पायी पालखी सोहळ्याचे यंदाचे २९वे वर्ष आहे. सोमवार, दि. ८ रोजी सकाळी ७:३० वाजता श्री सेवागिरी महाराज पालखीचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होईल. सोमवार, दि. ८ रोजी महिमानगड, मंगळवार, दि. ९ रोजी लोधवडे, बुधवार, दि. १० रोजी म्हसवड, गुरुवार, दि. ११ रोजी पिलीव, शुक्रवार, दि. १२ रोजी तांदूळवाडी, शनिवार, दि. १३ रोजी भाळवणी, रविवार, दि. १४ रोजी उपरी, सोमवार, दि. १५ रोजी वाखरी, मंगळवार, दि. १६ रोजी पंढरपूर मुक्कामी पोहोचेल. बुधवार, दि. १७ रोजी चंद्रभागेत स्नान करून नगरप्रदक्षिणा होईल. गुरुवार, दि. १८ रोजी चंद्रभागा स्नान करून दुपारी एकनंतर दिंडी तीर्थक्षेत्र पुसेगावकडे ट्रकमधून प्रस्थान करील.

ट्रस्टमार्फत दिंडीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याचा अपघाती विमा उतरवला जाईल. सर्व मुक्कामांच्या ठिकाणी निवाऱ्यासाठी अतिरिक्त तंबूंची सोय केली आहे. पंढरपूर येथील मुक्कामात वारकऱ्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी सोयीसुविधांनी युक्त प्रशस्त निवाऱ्याची सोय ट्रस्टमार्फत केली आहे. दिंडी सोहळ्याच्या यशस्वितेसाठी ट्रस्टचे चेअरमन रणधीर जाधव, विश्वस्त डॉ. सुरेश जाधव, संतोष ऊर्फ बाळासाहेब जाधव, संतोष वाघ, सचिन देशमुख, गौरव जाधव, सचिव विशाल माने व ग्रामस्थ विशेष परिश्रम घेत आहेत.

# पालिका रुग्णालयांमध्ये फिव्हर ओपीडी सुरू



**मुंबई :** पावसाळ्यात वातावरणातील बदलांमुळे ताप, सर्दी, खोकल्यासह डेंग्यू, मलेरिया, आदी साथीचे आजार वाढतात. त्यामुळे रुग्णालयांमध्ये उपचारासाठी रुग्णांच्या रांगा लागतात. या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाने पालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये तापसदृश आजारांच्या उपचारांसाठी २४ तास बाह्य रुग्णसेवा आणि 'फिव्हर ओपीडी' सुरू केली आहे. तत्काळ उपचारास प्राधान्य-पावसाळी आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या दृष्टीने पालिकेच्या विविध यंत्रणांच्या सक्रिय सहभागाने उपाययोजना करण्यात येत आहेत. पावसाळी आजारांच्या वेळीच प्रतिबंधासाठी मोठ्या प्रमाणात रुग्णांचा त्वरित शोध घेऊन तत्काळ उपचार करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. यंदा संपूर्ण मुंबई महानगरात पावसाळी आजारांसाठी तीन हजार बेड्स राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच तापसदृश आजारांसाठी 'फिव्हर ओपीडी'ची व्यवस्था करण्यात आली आहे. राजे एडवर्ड स्मारक (केईएम) रुग्णालयात दुपारी ४ ते रात्री १०, डॉ. रू. न. कूपर दुपारी २ ते रात्री ८, लोकमान्य टिळक सर्वसाधारण (शीव) रुग्णालयात २४ तास, बा. य. ल. नायर रुग्णालयात दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत, तर उपनगरी रुग्णालयात सायंकाळच्या वेळेत बाह्यरुग्ण सेवा उपलब्ध आहे.फोकाय पद्धतीची अंमलबजावणी-१) जागतिक आरोग्य संघटना, राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र (दिल्ली) व पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच पार पडलेल्या कार्यशाळेत मलेरिया, डेंग्यू आणि जलजन्य आजार यांचे प्रतिबंधक नियंत्रण व उपाययोजना याबाबत विशेष लक्ष केंद्रित अर्थात 'फोकाय' आधारित उपचार आणि सूक्ष्म आराखडा, यावर विशेष भर देण्यात आला आहे.२) जेथे एखाद्या आजाराचे सर्वाधिक रुग्ण आहेत, अशा ठिकाणी लक्ष केंद्रित करतानाच अधिकाधिक प्रतिबंधात्मक उपाययोजना त्या विशिष्ट विभागात राबविण्याचे उद्दिष्ट या पद्धतीनुसार ठेवण्यात येते.३) डासांची उत्पत्तीस्थाने शोधणे, तसेच ती स्थाने नष्ट करणे, अशा उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येतात. डेंग्यू आणि मलेरियाची रुग्णांची संख्या कमी करण्याच्या अनुषंगाने सूक्ष्म नियोजन करणे अपेक्षित आहे.आराखड्याची अंमलबजावणी करणार-यंदाच्या पावसाळ्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करतानाच आक्रमकपणे हा आराखडा राबवण्यात येणार आहे. एखाद्या भागात सर्वेक्षण करताना डासांच्या उत्पत्तीचा उगम शोधणे, सर्वेक्षण करणे, डेंग्यू आणि मलेरियाचे रुग्ण शोधणे आणि रुग्णांवर उपचार करणे यासारख्या उपाययोजना यामध्ये केल्या जातील, जेणेकरून या आजारांवर पूर्णतः नियंत्रण ठेवता येणार आहे



# सुरतची लक्झरी बस सापुतारा घाटात कोसळली

## दोन जण मृत्यूमुखी, पाच गंभीर जखमी

**सुरगाणा (नाशिक):** गुजरात राज्यातील डांग जिल्ह्यात असलेल्या सापुतारा घाटात रविवारी (दि.७) सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास पर्यटकांची खासगी लक्झरी बस दरीत कोसळून झालेल्याअपघातातदोन लहान मुलांचा मृत्यू झाला आहे. एका ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या नादात चालकाचे नियंत्रण सुटून बस कठडा तोडून दरीत गेली. या बसमध्ये सुमारे ७० प्रवासी होते. हे सर्व प्रवासी सुरत येथील रहिवासी असल्याचे सांगितले जाते.-ऊएठढखडएचएछढसापुतारा हे गुजरात राज्यातील व नाशिक जिल्ह्याच्या सीमेवरील एक पर्यटन स्थळ असल्याने विकेंडला याठिकाणी मोठी गर्दी असते. सध्या पावसामुळे परिसरातील निसर्ग बहरला आहे. त्यामुळे पर्यटकांची नेहमीप्रमाणे गर्दी होती.

रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास सुरतच्या पर्यटकांना घेऊन आलेली लक्झरी बस परतीच्या मार्गावर असताना राष्ट्रीय महामार्गावरील सापुताराजवळील घाटात संरक्षक कठडा तोडून खाली कोसळली.

चालक एका ट्रकला ओव्हरटेक करत असताना समोरून आलेल्या एका टेम्पोपासून वाचविण्याच्या प्रयत्नात बसवरील नियंत्रण सुटले.याअपघातातएक ८ वर्षाचा मुलगा व दहा वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते.

अपघातानंतर स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव मदतकार्य सुरू केले. माहिती मिळताच सापुतारा येथील अनेक रूग्णवाहिका व पोलिसांचे पथकही दाखल झाले. जखमींना शमगवा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले. त्यातील पाच प्रवाशी गंभीर जखमी झाले आहेत.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902
Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# दुग्धविकास मंत्र्यांच्या आश्वासनाशिवाय आता माघार नाही, राष्ट्रवादीची आक्रमक भूमिका



**अहमदनगर :** कांदा व दूध दरवाढीसाठी खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरूच आहे. आता येथे जिल्हाधिकारी आले तरीदेखील आंदोलन मागे घेतले जाणार नाही. जोपर्यंत दुग्धविकास मंत्री येथे येत नाहीत आणि दुधाचा दर जाहीर करत नाहीत तोपर्यंत आम्ही येथून उठणार नाही, असा इशारा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी दिला आहे.

या आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातदेखील येणार आहेत.राजेंद्र फाळके म्हणाले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे रविवारी जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांनी आंदोलन स्थळी येऊन आंदोलकांना दूध दरवाढीचे आश्वासन दिले तरच आंदोलन मागे घेतले जाईल. अन्यथा शरद पवारदेखील आंदोलनात उतरतील. सगळी खात्री करून आलो आहे. नेत्यांशी बोललेलो आहे. शासनाला आंदोलकांच्या मागण्या मान्य करायच्या नसतील तर महागात पडेल. आज आंदोलन जिल्हापुरते मर्यादित आहे. उद्या राज्यातले लोक येथे येतील, परवा देशातले लोकदेखील आंदोलनात सहभागी होतील. प्रशासनाला वाटत असेल की फक्त शरद पवार येतील पण देशाचे नेते विरोधी पक्ष नेते राहुल गांधी देखील येथे येतील. हे आंदोलन हलक्यात घेत असतील त्यांना हा इशारा आहे.पालकमंत्री आपण राज्यामध्ये मंत्री आहात आणि दुग्ध विकास मंत्री आहात.

जिल्हाधिकाऱ्यांच्या दारामध्ये जिल्ह्यातला शेतकरी येऊन उत्पादन खर्चावर दुधाचे दर मागतोय पण तुम्ही कुठल्या कोण्यामध्ये झोपलेला आहात? आंदोलकांना सामोरे गेला पाहिजेत, त्यांना सांगितलं पाहिजेत की एवढा खर्च उत्पादनाला येतो आणि राज्य सरकारने एवढा निर्णय घेतलाय, असेही फाळके यांनी म्हटले आहे.

# मी मुख्यमंत्री असताना श्वेतपत्रिकेचे वेगळे अर्थ काढले, त्याचे परिणामही भोगले, पृथ्वीराज चव्हाणांचं वक्तव्य

**जळगाव :** मी मुख्यमंत्री असताना श्वेतपत्रिकेचे वेगळे अर्थ काढले गेले, त्याचे परिणामही मला भोगावे लागले. पण श्वेतपत्रिका म्हणजे राज्याच्या जनतेशी साधलेला संवाद असतो. ती सरकारची कामाची एक दिशा, स्ट्रॅटेजी आणि ब्लू प्रिंट असते, असं धक्कादायक वक्तव्य काँग्रेसचे नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांनी रविवारी दुपारी जळगावात केलं.

जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील खिरोदा येथे आयोजित माजीमंत्री स्व. मधुकरराव चौधरी यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित कृतज्ञता सोहळ्यात मुख्य सत्कारार्थी म्हणून भाषण करतांना ते बोलत होते.पृथ्वीराज चव्हाणमुख्यमंत्री असताना आघाडी सरकारमध्ये श्वेतपत्रिकेच्या मुद्द्यावरून राजकारण चांगलंच तापलं होतं. त्याच विषयाला चव्हाणांनी आज पुन्हा हात घालत राष्ट्रवादीला डिवचल्याचं बोललं जातंय. पृथ्वीराज



चव्हाण मुख्यमंत्री असताना त्या काळात त्यांनी सिंचन क्षेत्रातील गैरव्यवहारासंदर्भात, तसेच या क्षेत्रात काय भरीव कामगिरी करता येईल, या संदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची आग्रही मागणी केली होती. त्याच मुद्द्यावरून त्याकाळी राष्ट्रवादी आणि काँग्रेसमध्ये मतभेद झाल्याचा इतिहास आहे. याच विषयाला अनुसरून पृथ्वीराज चव्हाण यांनी जळगावात हे वक्तव्य केलं. माजीमंत्री स्व. मधुकरराव चौधरी यांनी आपल्या कार्यकाळात शिक्षण क्षेत्रात भरीव काम केलं. शिक्षण क्षेत्रासाठी त्यांनी काढलेली श्वेतपत्रिका राज्याला मार्गदर्शक ठरली. हाच दाखला देत त्यांनी श्वेतपत्रिकेच्या मुद्द्याला हात घातला.तर आज पक्षही फुटले नसते... आजच्या या पाच वर्षांच्या घडामोडींमध्ये जर बाळासाहेब चौधरींसारखा सभापती असता, तर हे राजकारण घडलंच नसतं. पक्षही फुटले नसते, राज्याला न्याय मिळाला असता. पण नाही मिळाला. हरकत नाही. लोकसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने आम्हाला न्याय दिला. विधानसभेच्या निवडणुकीत पण जनता आम्हाला न्याय देईल, असंही चव्हाण यावेळी म्हणाले.

### भाजपच्या काही नेत्यांनी काँग्रेसला मतदान केले

# सुशीलकुमार शिंदेंचा गौप्यस्फोट



**सोलापूर :** लोकसभा निवडणुकीत भाजपच्या काही नेत्यांनी काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांना मतदान केले. पण आम्ही या नेत्यांचे नाव घेणार नाही, असा गौप्यस्फोट काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी रविवारी केला. काँग्रेसच्या वतीने रविवारी अक्कलकोट रोड येथील एका मंगल कार्यालयात कृतज्ञता मेळावा घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

शिंदे म्हणाले, मी आजवर ९ ते १० निवडणुका लढविल्या. यंदाची निवडणूक आमच्या दृष्टीने खूप सोपी होती. मला सर्वांत कमी त्रास या निवडणुकीत झाला. विरोधी पक्षाचे लोक निवडणुकीत पैसे वाटप करीत असल्याच्या तक्रारी आमच्यापर्यंत आल्या. मात्र आम्ही त्याकडे दुर्लक्ष केले. आम्ही त्यांची पर्वा केली नाही. कारण जनता आमच्या सोबत होती. काँग्रेसला सहकार्य करणाऱ्या भाजप नेत्यांनी नावे घेणार नाही, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसचे काही लोक तिकडे गेले - प्रणिती शिंदे

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, अनेक लोकांना या निवडणुकीत त्रास सहन करावा लागला. काही लोकं मॅनेज होऊन त्यांच्याकडे गेल्याच्या गोष्टी देखील कानावर आल्या. पण आम्ही दुर्लक्ष केले. लोकसभेचा पॅटर्न वेगळा असतो आणि विधानसभेचा वेगळा. ही गोष्ट लक्षात घ्या, असा सल्लाही त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना दिला.

# राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष निवडीचा चेंडू प्रदेशाध्यक्षांच्या कोर्टात

**जळगाव :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा नवीन कोणाच्या हातात द्यायची की, जुनेच पदाधिकारी कायम ठेवायचे, याचा निर्णय प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील घेणार आहेत. त्यामुळे काहींच्या भावना रवींद्र पाटील यांना कायम ठेवण्याच्या असल्या किंवा ज्येष्ठ नेत्यांना बदल व्हावा, असे वाटत असले तरी प्रदेशवरून काय निर्णय येतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी जळगावात येऊन सर्वांसमक्ष आणि बंद दाराआड अनेकांची मते जाणून घेतली. त्याचा अहवाल ते प्रदेशाध्यक्षांना सादर करणार आहेत. त्यानुसार पक्षाकडून निर्णय घेतला जाईल, अशी माहिती देशमुख यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना दिली.



लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचा आढावा घेणारी बैठक पंधरा दिवसांपूर्वी झाली होती. त्यात विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी जिल्हाध्यक्ष, महानगराध्यक्ष व इतर पदाधिकारी बदलावेत, असा ठराव एकमताने करण्यात आला आहे. यासंदर्भात पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मते जाणून घेण्यासाठी पक्षाचे नेते, माजी गृहमंत्री अनिल देशमुख रविवारी (दि. ७) जळगावला आले होते. पक्षाच्या कार्यालयात त्यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

यावेळी पक्षाचे निरीक्षक ड. प्रसेनजित पाटील, माजी मंत्री गुलाबराव देवकर, डॉ. सतीश पाटील, माजी आमदार अरुण पाटील, डॉ. बी. एस. पाटील, जिल्हा समन्वयक विकास पवार, सहकार जिल्हाध्यक्ष वाल्मिक पाटील, महिला प्रदेश अध्यक्ष रोहिणी खडसे, माजी जिल्हाध्यक्ष ड. रवींद्र पाटील, जिल्हाध्यक्ष वंदना चौधरी, श्रीराम पाटील, मंगला पाटील, विलास पाटील, माजी महानगराध्यक्ष अशोक लाडवंजारी, नामदेव चौधरी, एजाज मलिक आदी उपस्थित होते.

# संवाद वारी उपक्रमास वारकऱ्यांचा भरघोस प्रतिसाद

**सातारा :** शासनाच्या विविध योजनांची व जन कल्याणकारी योजनांची माहिती जन सामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या संवाद वारी उपक्रमास वारकऱ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे.

लोणंद, ता. खंडाळा येथे आजपासून संवाद वारी उपक्रमाचा जिल्ह्यात शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमात चित्ररथ, पथनाट्य, कला पथक आणि प्रदर्शन या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात येत आहे. या उपक्रमास वारकऱ्यांचा



भरघोस प्रतिसाद मिळत असून अनेक वारकरी योजनांची माहिती घेत आहेत. प्रदर्शनास भेट देत आहेत. विसाव्याच्या वेळेत पथनाट्याच्या माध्यमातून माहिती घेताना दिसत आहेत. या माध्यमातून योजनांची चांगली माहिती मिळत असल्याची भावना वारकरी व्यक्त करत आहेत.

लोणंद येथील शासकीय विश्रामगृहाच्या आवारात प्रदर्शन सुरू असून उद्या रविवार दि. ७ रोजी दिवसभर हे प्रदर्शन सुरू राहणार आहे.

# अकोल्यात भर पावसात निघाली भगवान जगन्नाथ यांची रथयात्रा : शेकडो भाविक झाले सहभागी

**अकोला :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पुरी धाम येथील भगवान जगन्नाथ यांच्या रथयात्रेचे औचित्य साधून आंतराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन)अकोलायांच्या वतीने रविवारी (७ जुलै) सायंकाळी शहरातून रथयात्रा काढण्यात आली. भर पावसात निघालेल्या रथयात्रेत सहभागी शेकडो भाविकांनी केलेल्या जय जगन्नाथच्या गजराने आसमंत निनादून गेला होता.

स्कॉनचे विदर्भ झोनल पर्यवेक्षक पूज्य अनंतशेषप्रभूजी यांच्या मार्गदर्शनात व अकोला इस्कॉनचे अध्यक्ष पूज्य वैदर्भीचरण प्रभूजी यांच्या पुढाकारातइ सरकारी बगीचा परिसरातील इस्कॉन सेंटर येथून सायंकाळी भगवान जगन्नाथ यांच्या रथयात्रेला प्रारंभ करण्यात आला. फुलांनी आकर्षक पद्धतीने सजविलेल्या रथात भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणी माता सुभद्रा यांच्या प्रतिमा ठेवण्यात आल्या होत्या.इस्कॉन सेंटर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत रथाची



पूजा करण्यात आली. त्यानंतर, भगवान जगन्नाथांचा जयघोष करत भाविकांनी रथ ओढण्यास प्रारंभ केला. पारंपरिक वाद्याच्या गजरात ही रथयात्रा जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, राणीसती धाम, गांधी रोड, सीटी कोतवाली चौक, खोलेश्वर, सरकारी बगिचा अशी मार्गक्रमण करत मित्र समाज क्लब येथे आली. त्या ठिकाणी रथ यात्रेचा समारोप करण्यात आला. शहरातील अनेक भाविक या रथयात्रेत सहभागी झाले होते. रथयात्रेत सहभागी इस्कॉनच्या सदस्यांनी रथयात्रेचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांना प्रसादाचे वितरण केले.

**भाविकांनी पावसात धरला फेर**

रथयात्रा सुरु होण्यापूर्वीच शहरात पावसाने जोरदार हजेरी लावली. पाऊस सुरु असतानाच रथयात्रेस प्रारंभ करण्यात आला. रथयात्रेत सहभागी झालेल्या महिला व पुरुष भाविकांनी हरे रामा-हरे कृष्णाच्या धूनवर भर पावसात फेर धरला. यावेळी भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

इस्कॉन धाममध्ये जगन्नाथ उत्सव

रथयात्रेचा समारोप झाल्यानंतर इस्कॉन धाममध्ये भगवान जगन्नाथाचा भव्य उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवात भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भाविकांना महाप्रसादाचे वितरण केल्यानंतर जगन्नाथ उत्सवाची सांगता करण्यात आली.

# पोलीस अधीक्षकांना दोन प्रकरणात उच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

**सातारा :** पंतप्रधान कार्यालयात सुरक्षा सल्लागारपदी कार्यरत असल्याची बतावणी करून लोकांना गंडा घालणारी साताऱ्यातील जोडी कश्मिरा पवार व गणेश गायकवाड या दोघांच्या सातारा पोलिसांच्या तपासाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने शंका उपस्थित करत सातारा पोलिस अधीक्षकांना ११ जुलै रोजी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

न्या. रेवती मोहिते डेरे आणि न्या. श्याम सी चांडक यांच्या खंडपीठाने यासंदर्भात ३ जुलै २०२४ रोजी सुनावणी करताना हा आदेश दिला. हा गुन्हा सीआयडी किंवा सीबीआयकडे हस्तांतरित करण्याची मागणी करणारी याचिका दाखल झाल्याने सुनावणी दरम्यान हा आदेश देण्यात आला. याचिकाकर्ते पुण्यातील व्यावसायिक फिलीप भांबळ यांनी सातारा येथे डिसेंबर २०२२ मध्ये कश्मिरा पवार आणि तिचा सहकारी गणेश गायकवाड यांच्या विरोधात तक्रार अर्ज दाखल केला होता.सातारा शहर पोलिसांनी ४ जानेवारी २०२३ रोजी अज्ञात व्यक्ती विरुद्ध गून्हा नोंद केला.

त्यानंतर १० जानेवारी २०२३ रोजी, काश्मिराच्या तक्रारीनंतर, सातारा पोलिसांनी भांबळ, गोरख मरळ आणि आणखी एका व्यक्तीविरुद्ध ५० लाख रुपयांची मागणी केल्याबद्दल आणि त्यांच्यातील आर्थिक वादानंतर तिच्याकडून ५० हजार रुपये जबरदस्तीने घेतल्याप्रकरणी खंडणीचा गुन्हा दाखल केला.भांबळ यांनी न्यायालयाच्या निदर्शनासाठी आणले की, मी तक्रारदार असताना पोलिस कर्मचारी राहुल घाडगे यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला. मला सातारा पोलिसांची भूमिका संशयास्पद वाटली आणि या प्रकरणाचा तपास सीआयडी किंवा सीबीआयकडे वर्ग करावा अशी विनंती करणारी फौजदारी याचिका मुंबई उच्च न्यायालयासमोर दाखल केली.या सुनावणी दरम्यान न्यायालयाने हा आदेश दिला. याबाबतचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने प्रसिद्ध केले आहे.

सातारा पोलिसांनी कश्मिरा पवार व गणेश गायकवाड यांना मागील महिन्यात ताब्यात घेतले होते. या प्रकरणात ८२ लाखांच्या फसवणूकप्रकरणी तिला अटक करण्यात आली होती. त्यांना दोन दिवसांच्या पोलिस कोठडी नंतर जामीन मंजूर करण्यात आला ही बाब त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणली.

# लोणंद मुक्कामी वारकऱ्यांची मांदियाळी

## श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे पादुका दर्शन घेण्यासाठी लोणंदनगरीत वारकरी आणि भाविकांची

**लोणंद :** श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे पादुका दर्शन घेण्यासाठी लोणंदनगरीत वारकरी आणि भाविकांची मांदियाळी झाली आहे. माऊली माऊलींच्या नामघोषात टाळ मृदंगाच्या गजरात भाविकांचा मेळा भरला आहे. जणू काही भाविकांच्या भक्तीचा महापूरच लोटल्या सारखी गर्दी झाली आहे.

माऊलीच्या दर्शनासाठी लोणंदच्या पालखी तळावरून पुर्व व पश्चिम दोन्ही बाजूला भविकांच्या लांबलचक दर्शनरांगा लागल्या होत्या. माऊलींच्या दोन दिवसाच्या मुकामात संपूर्ण लोणंद नगरी हरिनामाच्या गजराने दुमदुमुन गेली होती. माउलीच्या सोहळ्याच्या आगमनाने लोणंद नगरीला पंढरीचे स्वरुप येवून लोणंदच पंढरी झाल्याचा भास होतो आहे. भाविकांच्या दर्शनासाठी लागलेल्या दर्शन रांगांनी उच्चांक गाठला आहे .

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा लोणंद येथील मुक्कामाचा दुसरा दिवस आहे. लोणंदच्या पालखी तळावरील माऊलीच्या



तंबू बरोबरच मालक, सोहळा प्रमुख, संस्थान, चोपदार, शितोळे सरकार , वासकर महाराज, पालखी सोहळा विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, योगी निरंजन नाथ आदी मानाच्या दिंडयाचा मुक्काम ठिकाणी आहेत. या ठिकाणी पोलीस, आरोग्य, ग्रामपंचायत, वीज, आदी खात्यांचे केंद्रातुन वारकरी व भाविकांना मार्गदर्शन केले जात होते.

भाव तैसे फळ। न चले देवा पाशी बळ।
धावे जातीपाशी जाती। खूण येरा येरा चित्ती।

असा तुकाराम महाराजांचा अभंग एका दिंडीतील भजनात गायला जात होता. ठिकठिकाणी दिंड्यांचे तंबू लागलेले आहेत. या सगळ्यात लहान मुलांपासून अबाल वृद्धांपर्यंत सर्वजण माऊलीच्या भक्तीत तल्लीण झाले आहेत . अनेक ठिकाणी वारकऱ्यांच्या सेवेसाठी स्वयंसेवी संस्था पुढे आल्या आहेत. वारकऱ्यांना सर्व त्या सेवा पुरविण्यात प्रशासन आणि या संस्था मग्न आहेत. अनेक ठिकाणी पंगती बसलेल्या आहेत. मिळेल त्या ठिकाणी वारकरी वामकुक्षी घेत आहेत. कमी जास्त अंतर चालत वारकरी आळंदीपासून थकून आल्याने आज मुक्काम करून सकाळी पुढच्या प्रवासाला निघणार आहेत.

वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात अनेक संस्था पुढे आहेत. ठिकठिकाणी आरोग्य शिबिर तपासण्या सुरू आहेत. वारकरी भाविक माऊलींच्या भक्ती त असताना गुन्हेगारांना कुठेही संधी मिळणार मिळू नये यासाठी सातारा पोलीस अधीक्षक समीर शेख अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर व त्यांचे सर्व पथक परिसरावर नजर ठेवून आहे. पोलीस अधीक्षक समीर शेख सपत्नीक वारीत सहभागी झाले आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि सर्व प्रशासन वारीमध्ये आहे. पालखी सोहळा मात्र दुपारच्या न्याहारीनंतरच पुढे जाईल. त्यानंतर तरडगाव चांदोबाचा लिंब येथे पालखी सोहळ्यातील पहिले उभे रिंगण होईल.

# कवठेमहांकाळमध्ये शरद पवार फुंकणार विधानसभेची 'तुतारी'

## रोहित पाटलांच्या वाढदिवसाचे औचित्य : ८ जुलैला शेतकरी मेळाव्याचे आयोजन : जंगी मोटारसायकल रॅली

**तासगाव :** नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजप महायुतीला जोरदार झटका देत महाविकास आघाडीने मुसंडी मारली. महाविकास आघाडीच्या गटात असणारा उत्साह येणाऱ्या विधानसभेपर्यंत कायम रहावा, या उद्देशाने राष्ट्रवादीकडून शरद पवार पुन्हा एकदा महाराष्ट्र पिंजून काढण्याची तयारी करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून स्व. आर. आर. पाटील यांचे सुपुत्र रोहित पाटलांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधत शरद पवार यांच्या उपस्थितीत येत्या ८ जुलैला कवठेमहांकाळ येथे मोठा शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे.

विधानसभा निवडणुकीला अवघे काही दिवस राहिले असताना



शरद पवारांनी पुन्हा एकदा महाराष्ट्र पिंजून काढण्याचं शिवधनुष्य उचललं आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी व महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी राज्यातील सत्ताधारी भाजप महायुतीला घाम फोडला. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर पवारांनी आता आपला मोर्चा विधानसभेकडे वळवला आहे.

तासगाव - कवठेमहांकाळमधून आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील यांनाच यावेळी विधानसभेला संधी देण्यात येईल, असं बोललं जात आहे. त्याच अनुषंगाने रोहित पाटलांच्या वाढदिवसाच्या 'टायमिंग' साधत शरद पवारांनी इथे ८ जुलैला तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघासाठी संपूर्ण दिवसभराचा भरगच्च कार्यक्रम दिला आहे. याच मेळाव्यातून विधानसभा प्रचाराचा शुभारंभ शरद पवार करणार, अशी जोरदार चर्चा सुरू आहे.

सोमवारी (८ जुलै) सकाळी शरद पवार यांच्या हस्ते तासगाव कृषी उत्पन्न बाजार समिती येथे महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघाच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर दुपारी कवठेमहांकाळ तालुक्यातील प्रसिद्ध आरेवाडी येथील बिरोबा मंदिरात शरद पवार दर्शनासाठी भेट देणार आहेत. यानंतर कवठेमंहाकाळ येथील महांकाली कारखान्याच्या मैदानावर भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी दोन्ही तालुक्यातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांची जमवाजमाव करण्याची तयारी सुरू झाली आहे. या मेळाव्याच्या जय्यत तयारीसाठी कार्यकर्त्यांची यंत्रणा कामालाही लागली आहे.

आगामी विधानसभेच्या दृष्टीने या शेतकरी मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून विधानसभेसाठी रोहित पाटील यांच्या उमेदवाराची अधिकृत घोषणा शरद पवार याच मेळाव्यात करतील, अशी चर्चा आहे. लोकसभा निवडणुकीत स्टार प्रचारक म्हणून रोहित पाटील यांची संपूर्ण महाराष्ट्रभर चांगली छाप पडली आहे. स्व. आर. आर. पाटील यांच्यासारखीच देहबोली व भाषण शैली असणाऱ्या रोहित पाटील यांनी आपल्या प्रभावशील भाषणाने सर्वांनाच प्रभावित केले आहे. आगामी काळात महाराष्ट्रातील राजकारणावर आपला ठसा उमटवण्यासाठी आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील आगामी विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी करत आहेत. त्याच दृष्टीने शरद पवार यांच्या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले असून कवठेमहांकाळ येथे होणाऱ्या शेतकरी मेळाव्यात राष्ट्रवादीकडून मोठे शक्ती प्रदर्शन होणार आहे.

### मोटरसायकल रॅलीने मेळावास्थळी शरद पवारांचे होणार जंगी आगमन..!

**कवठेमहांकाळ तालुक्यातील आरेवाडीतील बिरोबा देवस्थानचे दर्शन घेऊन शरद पवार हजारो मोटरसायकलच्या रॅलीने कवठेमहांकाळ येथील महांकाली कारखान्याच्या मैदानावर होणाऱ्या शेतकरी मेळाव्यास्थळी दाखल होणार आहेत. या मोटरसायकल रॅलीचीही जय्यत तयारी राष्ट्रवादीकडून सुरू आहे.**

# विशाळगड अतिक्रमणावरून संभाजीराजे आक्रमक

## अतिक्रमणविरोधात १३ जुलै रोजी चलो विशाळगड ; मा. ख. संभाजीराजे छत्रपती

**कोल्हापूर :** : विशाळगडाची अवस्था दयनीय झाल्याने,याविरोधात शिवप्रेमींच्या संतप्त भावनेमुळे विशाळगड अतिक्रमणासह अनिष्ट प्रथा आणि अवैध धंदे मुक्त करण्याचा निर्णय झाला होता. त्यासाठी १ कोटी ६४ लाखांहून अधिक निधी मंजूर झाला. दिड वर्ष झाले, परिस्थिती जैसे थे आहे. याचा राज्य सरकारला जाब विचारण्यासाठी माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी येत्या १३ जुलै रोजी चलो विशाळगडची हाक दिली आहे.

तसेच याच दिवशी दुपारी दोन वाजता आंदोलनाची पुढील दिशा जाहीर केली जाणार, असल्याचही त्यांनी सांगितले

यावेळी बोलताना, माजी खासदार संभाजीराजे यांनी,गेल्या दीड वर्षांपूर्वी ४ डिसेंबर २०२२ रोजी आपण स्वतः किल्ले विशाळगडला भेट दिली होती, त्यावेळी तेथील परिस्थिती पाहून वाईट वाटले. ७ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी यांच्यासोबत प्रशासनाची बैठक घेऊन,विशाळगडची परिस्थिती समजावून सांगुन,अतिक्रमण काढण्याची मागणी केली होती. त्यासाठी १ कोटी ६४ लाख रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला. पण गेल्या दीड वर्षात अध्यापही विशाळगडावरील अतिक्रमण निघालेले नाही. पन्हाळगडाच्या वेढ्यातून सुटल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज ज्या दिवशी विशाळगडावर पोहोचले त्याच १३ जुलै दिनाचे औचित्य साधून, शिवप्रेमींनी विशाळगडावर याव अस आवाहन करत असल्याचे संभाजीराजे यांनी यावेळी सांगितले. यापूर्वी अनेक शिवभक्तांनी विशाळगडावरील अतिक्रमण, अनिष्ट प्रथा तसच अवैध धंद्यावरुन आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. हि अतिक्रमणे दोन्ही बाजुंची असल्याचे सांगून, शासनाने गेल्या दीड वर्षात काय केले याचा जाब द्यावा .हा जाब विचारण्यासाठीच आता येत्या १३ जुलै रोजी दुपारी दोन वाजता महाराष्ट्रातील सर्व शिवभक्तां -सह किल्ले विशाळगडावर जाणार असल्याच त्यांनी बैठकीत सांगितल. तसच त्यावेळीच आंदोलनाची पुढील दिशा विशाळगडावरच ठरवली जाणार असल्याचही त्यांनी सांगितले.

यावेळी जेष्ठ इतिहास संशोधक डॉ.वसंत मोरे, डॉ. मंजुश्री पवार, स्वराज्य संस्थेचे संजय पवार,शिवभक्त आबा वेल्हाळ, शाहिर दिलीप सावंत, संभाजी ब्रिगेड राज्य समन्वयक रुपेश पाटील,हेमंत साळोखे,फत्तेसिंह सावंत,विजय सासरे,नाना सावंत, यांच्यासह विविध शिवप्रेमी संघटनांचे पदाधिकारी,शिवभक्त,गडप्रेमी उपस्थित होते.

# दोन मुलांचा दुर्दैवी मृत्यू; विरह सहन न झाल्याने आईने सोडले प्राण

**कोल्हापूर :** एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळणे म्हणजे काय असत याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे शाहूवाडी तालुक्यातील कोपर्डे येथील घटना. शेतात काम करत असताना विजेचा स्पर्श झाल्याने दोन तरुण मुलांचा अंत झाला, याचा धक्का सहन न झाल्याने मुलांच्या विरहात आईनेही प्राण सोडला. नंदाताई कृष्णा पाटील (वय ५६)असं या माऊलीचे नाव असून संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे

याबाबतची अधिक माहिती अशी की, दि. ३ रोजी कोपार्डे ता. शाहूवाडी येथील कडवी नदीजवळ असणा-या शेतात सुहास कृष्णा पाटील (वय ३६) व स्वप्नील कृष्णा पाटील (वय ३१) हे दोघे भाऊ भात रोप लावण आटोपून बुधवारी दुपारी पिकांवर तणनाशक मारण्यासाठी शेताकडे गेले होते. तणनाशक मारत असताना सुहासला वीजेच्या तारेचा जोरदार धक्का बसून तो शेतात पडला असता, दादा काय झाल असे म्हणत स्वप्नील त्यांच्याजवळ गेला असता त्यालाही वीजेचा धक्का बसून दोघे भाऊ शेतात निपचित पडले. यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आपली दोन्ही मुले अजून घरी का आली नाहीत म्हणून त्यांचे वडिल कृष्णा पाटील तेथे गेले. दोन्ही मुले निपचित पडल्याने ते भांबवून गेले. त्यांनी आरडा ओरड केली असता गावातील लोकांनी धाव घेऊन दोघांना उपचारासाठी दाखल केले मात्र त्यांच्या मृत्यू झाला होता.

हातात तोंडाला आलेल्या दोन मुलं मृत्युमुखी पडल्याने पाटील कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगरच कोसळला होता. पोटच्या दोन तरुण मुलांना खांदा देण्याची वेळ ज्या पित्यावर येते त्याचं दुःख त्यालाच माहिती दरम्यान या दुःखातून सावरत नाही तोपर्यंत पत्नी नंदाताई पाटील यांना मुलांचा विरह सहन न झाल्याने शनिवारी रात्री हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना उपचारासाठी दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण गाव हादरून गेला असून अत्यंत शोकाकुल वातावरणात नंदाताई पाटील यांच्यावर रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईकांनी आणि निकटच्या लोकांनी केलेला आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.दोन कमावती मुलं, पती, सून आणि नात असा गुण्यागोविंदाने सुरू असणारा संसार पत्त्यांच्या डावासारखा कोसळला.

## अवकाळीमुळे टोमॅटो उत्पादन घटले?

**तासगाव :** जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर ८० रुपये प्रति किलोवर गेले होते. एका आठवड्यात प्रति किलो ४० रुपयांनी दरवाढ झाली होती.

आता जुलैच्या पहिल्या आठवड्यात दर्जेदार टोमॅटोचे दर १०० रु. किलोवर गेले आहेत. सध्या किरकोळ बाजारात दर्जानिहाय टोमॅटोचे दर ७५ रु.ते १०० रु.पर्यंत आहेत. प्रामुख्याने पुणे, मुंबईत दरांत तेजी आहे.

मुंबई, पुण्यापेक्षा बेंगळूरु, चेन्नईत टोमॅटोचे दर अधिक आहेत. त्या तुलनेत उत्तरेत दरात फारशी तेजी नाही. मागील वर्षी जुलै - ऑगस्टमध्ये दिल्लीत टोमॅटोचे दर २२५ ते २५० रु.वर गेले होते. सध्या तरी तशी स्थिती नाही.

# केदारलिंगाच्या मूर्ती संवर्धनाचे काम ढकलले पुढे



**कोल्हापूर :** श्रावण षष्ठी यात्रेमुळे श्रीकेदारलिंगाच्या मूर्ती संवर्धनाचे काम पुढे ढकलण्यात आले असून भाविकांसाठी दर्शन नियमित सुरु राहणार असल्याची माहिती पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे सचिव सुशांत बनसोडे यांनी दिली आहे.

श्री. केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी येथील श्री. केदारलिंग देवाच्या मूर्तीच्या संवर्धनाचे काम सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग पुणे यांच्यामार्फत दि.७ ते दि.११ जुलै २०२४ दरम्यान करण्यात येणार होते. परंतु आज दिनांक ६ जुलै रोजी वाडी रत्नागिरी येथील श्री. केदारलिंग देवाच्या सर्व पुजाऱ्यांनी बैठक घेऊन श्री. केदारलिंग देवाची श्रावण षष्ठी यात्रा दि.१० ऑगस्ट २०२४ रोजी होणार आहे. या यात्रेसाठी पुजारी वर्गाला, आधीपासून तयारी करावी लागते. याचा विचार करुन श्री. केदारलिंग देवाच्या मुर्तीच्या संवर्धनाचे काम पुढे ढकलण्यात यावे, अशी विनंती प्रशासक तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याकडे निवेदन देवून केली आहे. या निवेदनाचा विचार करुन श्री. केदारलिंग देवाच्या मुर्ती संवर्धनाचे काम पुढे ढकलण्यात आले आहे. त्यामुळे श्री. केदारलिंग देवाचे दर्शन नियमित सुरु राहील, असे देवस्थान व्यवस्थापन समितीकडून कळवण्यात आले आहे.

# लाडकी बहीण' योजनेचा लाभ सर्व महिला भगिनींना मिळवून द्याः सत्यजितसिंह पाटणकर



**पाटण :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या ' लाडकी बहीण ' योजनेसाठी पाटण विधानसभा मतदारसंघातून बहुसंख्य महिला भगिनींना याचा लाभ मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकारी , कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असे आवाहन पक्षाचे नेते व जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांनी केले. पाटण येथे आयोजित पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

यावेळी बोलताना सत्यजितसिंह पाटणकर पुढे म्हणाले की, आपल्यासह जनता, व्यापारी, उद्योजक यांनी भरलेल्या जीएसटीसह अन्य करातून अशा पद्धतीच्या योजना शासन राबवत असते.

त्यामुळे या योजनेच्या श्रेय हे खरंतर आपण टॅक्स भरणाऱ्या मंडळींचे असते. अशा योजनांकडे पाहताना कोणीही पक्ष, राजकीय गटतट अथवा सत्ताधारी, विरोधक असे न पाहता सर्वसामान्यांसाठी सर्वांनीच मिळून केलेला हा एक सार्वत्रिक प्रयत्न असतो. याच दृष्टिकोनातून या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवणे हे प्रत्येक सुशिक्षित, सुसंस्कृत पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. पाटण विधानसभा मतदारसंघात असलेल्या सर्वाधिक महिला भगिनींना या ' लाडकी बहीण ' योजनेचा लाभ मिळवून देणे हे आपल्या प्रत्येकाचेच नैतिक कर्तव्य आहे. त्यामुळे आपला विभाग, गाव तसेच वार्ड, प्रभाग निहाय पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आपल्या आजूबाजूच्या महिलांना या योजनेचा लाभ मिळवून देताना संबंधित कागदपत्रे, तांत्रिक अटी शर्थी पूर्ण करताना सर्वतोपरी सहकार्य करावे. याशिवाय यातूनही काही अडचणी असल्यास पाटण येथील आपल्या पक्ष कार्यालयात यासाठी विशेष कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या असून येथूनही शासकीय योजनांसाठीआपल्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यात येईल. ज्या पद्धतीने आपण मतदान वाढीसाठी प्रयत्न करतो त्याहीपेक्षा अधिक गतीने या ' लाडकी बहीण ' योजनेमध्ये आपल्या मतदारसंघात राजकीय पक्ष, गटतट न पाहता बहुसंख्य महिलांना लाभ देण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असे आवाहनही शेवटी सत्यजितसिंह पाटणकर यांनी केले आहे.

# सिध्देश्वर दिंडीचे पंढरपूर वारीसाठी प्रस्थान

**देऊळगावराजे :**

पंढरीसी जारे आल्यानो संसारा ।  
दिनाचा सोयरा पांडुरंग ।।  
वाट पाहे उभा भेटीची आवडी ।  
कृपाळू तातडी उतावीळ ।।

या संतांच्या उक्तीप्रमाणे देऊळगाव राजे येथील सिद्धेश्वर प्रसादक दिंडी सोहळ्याचे ज्ञानोबा माऊली तुकाराम जयघोषात भक्तिमय वातावरणात पंढरपूरच्या दि . ७रोजी प्रस्थान झाले. दिंडीचे हे १७वे वर्ष आहे, हि दिंडी देऊळगाव राजे, भांबोरा,राशीन राजुरी, पोफळज ,शेलगाव वांगी, अकोले खुर्द, परिते, आजोती मार्गे दि.१५दिवशी पंढरपूरला पोहोचणार आहे.

देऊळगाव राजे येथे आज सिद्धेश्वर मंदिरात पंचक्रोशीतील वारकरी जमा होऊन ज्ञानोबा माऊली तुकाराम महाराज जयघोष करीत वारकऱ्यांनी भजन केले नंतर प्रसाद घेऊन पूर्ण गावाला प्रदक्षिणा घालून वैष्णवांचा मेळा सिद्धटेकच्या दिशेने दुपारी मार्गस्थ झाला या सोहळ्याचे नियोजन शांतीलाल गिरमकर, विठ्ठल आवचर ,प्रमोद गोडसे ,पप्पू कानगुडे ,चंद्रकांत आवचर, रामभाऊ दुधाट आदींनी केले . प्रस्थान वेळी देऊळगावराजे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा करून दिंडी सोहळ्याला आगळा वेगळा निरोप दिला, देऊळगाव राजे



येथील डॉक्टर मेडिकल असोसिएशनच्या वतीने वारकऱ्यांसाठी लागणाऱ्या सर्व मेडिकल वस्तूंचे यावेळी मोफत वाटप करण्यात आले, दिंडी सोहळा प्रस्थान वेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वीरधवल जगदाळे व पुणे जिल्हा भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष वासुदेव काळे, तुकाराम आवचर आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# नैसर्गिक संसाधने जपली पाहिजेत : न्या. श्रीराम मोडक

## 'पुणे विल्डरनेस' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे:** पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत 'जीविधा' संस्थेच्या 'हिरवाई महोत्सव' अंतर्गत ७ जुलै रोजी जीविधा संस्थेचा वर्धानपनदिन साजरा करण्यात आला. न्या.श्रीराम मोडक ( मुंबई उच्च न्यायालय) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. न्या.श्रीराम मोडक, एनडीए चे प्राचार्य ओमप्रकाश शुक्ला ,डॉ.महेश शिंदीकर यांच्या हस्ते 'पुणे विल्डरनेस' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.राजीव पंडित व अनुज खरे यांनी हे पुस्तक संपादित केले आहे.

अनुज खरे व राजीव पंडित यांच्या जंगलातील अनुभवांवर आधारीत मुलाखतीचा कार्यक्रम झाला . डॉ.महेश शिंदीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. जीविधा 'च्या वतीने वृंदा पंडित



यांनी स्वागत केले.राजीव पंडित यांनी प्रास्ताविक केले.उष:प्रभा पागे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

संसाधनांचा वापर करताना विचार करा : न्या. मोडक

न्या. मोडक म्हणाले,' जंगलात जाण्याची गोडी राजीव पंडीत, अनुज खरे यांच्यामुळे निर्माण झाली. फिरण्याची प्रेरणा अनेकांना या दोघांनी दिली. निसर्ग जागृती विषयक काम करणे यासाठी सखोल निष्ठा लागते. संस्था चालविताना सातत्य लागते. त्यातून जी जागरूकता निर्माण होते, ती महत्वाची आहे. निसर्गाकडे निरनिराळ्या दृष्टीकोणाने पाहिले जाते. निसर्ग विषयात करीयर करणे, याचे श्रेय पुण्यातील अनेकांना आहे. आपण निसर्गाला देव मानतो. आपले सण निसर्गाशी जोडलेले आहेत. ही पृथ्वी जपली पाहिजे. संसाधनांचा वापर करताना विचार केला पाहिजे, अभ्यास केला पाहिजे. संसाधने लवकर संपवली जात आहेत. पृथ्वीची नवनिर्मिती होत नाही.भोगवाद वाढवता कामा नये. निसर्गाकडे जाताना आपली हाव, गरजा याबद्दल विचार केला पाहिजे.

पर्यावरण व विकास याचे संतुलन साधले पाहिजे. मोठे पूल, बोगदे होताना निसर्गाचा ऱ्हास होतो का याकडे लक्ष दिले पाहिजे. पुढच्या पिढीला आपण काय शिल्लक ठेवणार आहोत ? असा प्रश्नही त्यांनी विचारला.

अनुज खरे आणि राजीव पंडित यांनी त्यांच्या निसर्गप्रेमाचा प्रवास सांगितला. ' अभियांत्रिकीची पाश्र्वभूमी असली तरी निसर्गाकडे वळलो.जंगलाचा अभ्यास केल्यावर ते जास्त कळू लागले,

त्यातून ते वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले ', असे राजीव पंडित यांनी सांगितले. अनुज खरे म्हणाले, 'कौटुंबिक पार्श्वभूमी आणि वाचनातून जंगल भ्रमंती सुरू झाली. वन विभागाच्या अडचणी देखिल समजून घेतल्या. छोट्या मोठ्या सहलीतून अनुभव वाढत गेले. निसर्गाच्या छोट्या छोट्या घटकात रस घेतला पाहिजे. फक्त वाघ दिसणे हे पर्यटकाचे उद्दीष्ट नसावे, तर जंगल पाहणे , समजून घेणे, हे उद्दीष्ट असावे '.



# सेल्फी घेताना नदीत पडून तरुण बेपत्ता

**सांगली :** मैत्रिणीसोबत कृष्णा नदीवरील बंधाऱ्यावर गेलेला तरुण सेल्फी घेण्याच्या प्रयत्नात नदीत पडल्याने पाण्याच्या जोरदार प्रवाहासोबत वाहून गेला. सायंकाळपर्यंत बचाव पथकाला त्याचा शोध लागलेला नव्हता.

सांगली वाडीकडील तीरानजीक असलेल्या बंधार्यावर मैत्रिणी समवेत सेल्फी घेताना मोईन मोमीन (वय २४, रा. शामरावनगर) हा तरूण पात्रात पडून बेपत्ता झाला. रविवारी सकाळी हा प्रकार घडला.

मैत्रिणीने हा प्रकार नातेवाईकांना कळवल्यानंतर आयुष्य हेल्पलाईन टीम, स्पेशल रेस्क्यू टीमच्यावतीने हरिपूरपर्यंत शोध घेण्यात आला. सायंकाळपर्यंत मोईन याचा ठावठिकाणा समजू शकला नाही.